[इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीमध्ये भाषांतर]

सर्वोच्च न्यायालयाचे अहवाल - २ एस.सी.आर.-७६५-७७२

दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपिल क्र. ५१७/१९५८

सी.ए.अब्राहम,उप्पूट्टील,कोट्टायम

वि.

आयकर अधिकारी, कोट्टायम आणि इतर

निकालाची तारीख:२९ नोव्हेंबर,१९६०

(जे. एल. कपूर, एम. हिदायतुल्लाह. जे. सी. शाह.,न्यायमूर्ती)

आयकर कायदा - भागीदारी फर्मचे उत्पन्न दडवणे - शास्ती,भागीदारीच्या विसर्जनानंतर आकारली जाऊ शकते का - आयकर कायदा, १९२२ (१९२२ चा अधिनियम क्रमांक दोन), कलम २८(१)(क),४४.

हेडनोट:

अपीलकर्ता जो दुसऱ्या व्यक्तीशी भागीदारी करून अन्नधान्याचा व्यवसाय करत होता त्याने भागीदाराच्या मृत्यूनंतरदेखील लेखा वर्षांसाठी भागीदारी संस्थेचे उत्पन्न म्हणून रिटर्न सादर केले.

असे आढळून आले की भागीदारी संस्थेचे काही उत्पन्न दडवून ठेवण्यात आले. आयकर अधिकाऱ्याने दडवलेल्या उत्पन्नासाठीच भागीदारी संस्थेला करपात्र ठरविले नाही पण सदर उत्पन्न लपविल्याबद्दल दंडदेखील ठोठावला. उच्च आयकर अधिकाऱ्यांसमोर दाखल अपीलामध्ये अपयश आले आणि त्यानंतर अपीलकर्त्याने, भागीदाराच्या मृत्यूमुळे भागीदारी संस्था विसर्जित झाली आणि भागीदारी संस्था विसर्जनानंतर दंड लादता येत नाही ही कारणे देऊन उच्च न्यायालयात उत्प्रेषण लेख (रिट ऑफ सर्टीओररी) साठी याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली.उच्च न्यायालयाच्या प्रमाणपत्रावरून अपील दाखल झाल्यावर, असा निर्णय देण्यात आला की, आयकर कायद्याच्या कलम ४४ आणि इतर तरतुदींनुसार विसर्जित भागीदारी संस्थेचा भागीदार लेख वर्षांसाठी केवळ आयकर आकारणीसाठीच जबाबदार नाही तर सदर कायद्याच्या कलम २८(१)(क) अन्वये भागीदारी संस्था विसर्जित झाल्यानंतर देखील भागीदारी संस्थेचे उत्पन्न लपविल्याबद्दल दंड भरण्यास जबाबदार असेल. हिंदू संयुक्त कुटुंबाच्या विघटनाचे साधर्म्य भागीदारी संस्थेच्या विसर्जनास लागू होत नाही.

मरेड्डी कृष्ण रेड्डी विरुद्ध आयकर अधिकारी, तेनाली, [१९५७] ३१ आय.टी. आर.६७८, मंजूर

आयकर आयुक्त वि. रायलसीमा ऑइल मिल्स, [१९५९] ३७ आय.टी. आर. २०८ आणि एस.व्ही.वीरप्पन चेट्टियार विरुद्ध आयकर आयुक्त, मद्रास, [१९५७] ३२ आय.टी. आर. ४११, नामंजूर.

महाकाली सुब्बाराव विरुद्ध आयकर आयुक्त, [१९५७] ३१ आय.टी. आर.८६७, उल्लेखनीय.

विधीमंडळाचा हा उद्देश होता की, कायद्याच्या प्रकरण चार मधील तरतुदी ह्या भागीदारी संस्थेला तिचा व्यवसाय बंद झाल्यानंतरही लागू होईल. आर्थिक कायद्याचा अर्थ लावताना त्यामध्ये काही कमतरता असल्यास न्यायालय ती दुरुस्त करू शकत नाही. काही शंका असल्यास त्याच अर्थ करदात्याच्या बाजूने लावावा.

“निर्धारित कर” या अभिव्यक्तीचे वेगवेगळे अर्थ आहेत व कायद्याच्या प्रकरण चार आणि कलम ४४ मध्ये व्यापक अर्थाने वापरली आहे ती अभिव्यक्ती केवळ कराच्या मोजणीपुरते मर्यादित नाही तर कराची मोजणी करताना उत्पन्न लपविल्याबद्दल दोषी आढळलेल्या करदात्यांना दंड आकारणे हे त्यामध्ये समाविष्ट आहे.

आयकर आयुक्त, बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि एडन वि.खेमचंद रामदास, [१९३८] ६ आय.टी. आर.४१४,याचा संदर्भ घेतला.

प्राप्तिकर कायद्याने आयकर अधिकाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या अयोग्य आदेशांविरुद्ध दिलासा मिळवणेसाठी संपूर्ण यंत्रणा उपलब्ध करून दिली असून अपीलकर्ता त्या यंत्रणेचा त्याग करून करनिर्धारण अधिकाऱ्यांच्या विरोधात घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या अधिकारितेकडे धाव घेऊ शकत नाही.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र :दिवाणी अपील क्र. ५१७/१९५८.

केरळ उच्च न्यायालयाने ओ.पी.क्रमांक २१५/१९५७ मध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर,१९५७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध अपील.

अपिलार्थीसाठी- जी.बी.पै. आणि सरदार बहादूर.

उत्तरवादींसाठी- हरदयाल हार्डी आणि डी.गुप्ता.

न्यायालयाचा निकाल न्यायमूर्ती शाह यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, १९६० रोजी पारित केला.

सी.ए.अब्राहम,याला नंतर अपीलकर्ता म्हणून संबोधले आहे आणि एक एम.पी.थॉमस नामक व्यक्ती यांनी कोट्टायम येथे एम.पी.थॉमस अँड कंपनीच्या नावाने आणि शैलीत, भागीदारीत अन्नधान्याचा व्यवसाय केला. एम.पी.थॉमस यांचे ११ ऑक्टोबर,१९४९ रोजी निधन झाले. लेखा वर्ष ११२३, ११२४ आणि ११२५ एम.ई. ऑगस्ट १९४७-जुलै १९४८, ऑगस्ट १९४८-जुलै १९४९ आणि ऑगस्ट १९४९-जुलै १९५० या कालावधीसाठी अपीलकर्त्याने भागीदार म्हणून नोंदणी नसलेली भागीदारी संस्था म्हणून भागीदारीच्या उत्पन्नाचे रिटर्न सादर केले. कारनिर्धारणाच्या कार्यवाही दरम्यान, असे आढळून आले की भागीदारी संस्थेने काल्पनिक नावाने वेगवेगळ्या वस्तूंमध्ये व्यवहार केले होते आणि त्यातून मिळालेले भरीव उत्पन्न जाहीर करण्यात कसूर केली होती. २९ नोव्हेंबर १९५४ च्या आदेशानुसार, आयकर अधिकाऱ्याने त्रावणकोर आयकर कायद्यांतर्गत करनिर्धारण वर्ष ११२४ एम.ई.आणि भारतीय कर कायदा अंतर्गत कारनिर्धारण वर्ष १९४९-५० आणि १९५०-५१ संदर्भात भागीदारी संस्थेच्या दडवलेला

उत्पन्नाचे निर्धारण केले आणि त्याच दिवशी भारतीय आयकर कायद्याचे कलम २८ अंतर्गत १९४९-५० आणि १९५०-५१ या वर्षांच्या संदर्भात त्रावणकोर आयकर कायदा कलम ४१, अंतर्गत ११२४ एम.ई. वर्षासाठी नोटीसा जारी करून भागीदारी संस्थेला दंड का लावला जाऊ नये याचे कारण दाखवावे असे नमूद केले. अपीलकर्त्यांना या नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

प्राप्तिकर अधिकाऱ्याने अपीलकर्त्याच्या स्पष्टीकरणाचा विचार केल्यानंतर भागीदारी संस्थेवर वर्ष ११२४ एम.ई. च्या संदर्भात रु.५,०००, वर्ष १९५०-५१ च्या संदर्भात रु.२,००० आणि वर्ष १९५१-५२ च्या संदर्भात रु.२२,००० एवढा दंड ठोठावला. आयकर अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांविरुद्ध दाखल केलेले अपील सहायक अपिलीय आयुक्तांनी फेटाळून लावले. त्यानंतर अपीलकर्त्याने केरळ उच्च न्यायालयाकडे अर्ज केला आणि कर निर्धारण आणि दंड आकारण्याचे आदेश रद्द करण्यासाठी उत्प्रेषण लेख (रिट ऑफ सर्टीओररी) पारित करण्याची विनंती केली. ऑक्टोबर, १९४९ मध्ये एम.पी. थॉमस यांच्या निधनामुळे भागीदारी संस्था विसर्जित केल्यानंतर, भागीदारी संस्थेच्या विरोधात दंड आकारणारा कोणताही आदेश पारित करता येणार नाही, असा दावा अपीलकर्त्याद्वारे करण्यात आला होता. मरेड्डी कृष्णा रेड्डी विरुद्ध आयकर अधिकारी, तेनाली[1] या प्रकरणातील आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालास अनुसरून उच्च न्यायालयाने अर्ज फेटाळला. याचिका फेटाळण्याच्या आदेशाविरुद्ध, उच्च न्यायालयाच्या प्रमाणपत्रासह हे अपील

1 [१९५७] ३१ आय.टी.आर.६७८

दाखल करण्यात आले आहे. आमच्या मते अपीलकर्त्याने दाखल केलेली याचिका विचारात घेतली जावयास नको होती. प्राप्तिकर कायदा कराचे निर्धारण आणि दंड आकारण्यासाठी आणि प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या कोणत्याही अयोग्य आदेशांच्या संदर्भात दिलासा मिळवण्यासाठी संपूर्ण यंत्रणा प्रदान करण्याची आणि अपीलकर्त्याला त्या यंत्रणेचा अवलंब न करता आणि न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करण्याचा पुरेसा उपाय खुला असताना राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयात दिलासा मागण्यासाठी धाव घेण्याची परवानगी देता येत नसण्याची तरतूद करतो. परंतु उच्च न्यायालयाने त्याची ही याचिका मान्य करून अपीलकर्त्याला या न्यायालयात दाद मागण्याची मुभाही दिली आहे. या याचिकेवर सुनावणी होऊन परवानगी मंजूर करण्यात आल्याने, सुरुवातीच्याच टप्प्यावर अपील फेटाळणे न्याय्य ठरेल असे आम्हाला वाटत नाही. गुणवत्तेवर, अपीलकर्त्याला दिलासा मिळण्याचा हक्क नाही. आयकर अधिकाऱ्याला असे आढळून आले की अपीलकर्त्याने कराचा भरणा टाळण्याच्या उद्देशाने, जाणूनबुजून त्याच्या उत्पन्नाचे महत्वाचे तपशील लपवले. ही भागीदारी संस्था विविध नावाने धान्याचे व्यवहार करत असतानाही, लेखा नोंदवहीत त्या व्यवहारांच्या नोंदी केल्या नाहीत आणि अनेक व्यक्तीकडून कर्ज घेतल्याचा दिखावा करत कर्जाच्या खोट्या क्रेडिट नोंदी केल्या. त्यामुळे दंड आकारण्यासाठी कलम २८(१)(क) मध्ये विहित अटींची पूर्तता करण्यात अली. परंतु अपीलकर्त्याचे म्हणणे आहे की, एम.पी.थॉमसच्या मृत्यूनंतर करपात्र संस्थेचे अस्तित्व संपुष्टात आले होते आणि भारतीय प्राप्तिकर कायद्यातील कलम २८(१)(क)अंतर्गत भागीदारी संस्थेच्या

विसर्जनानंतर दंड भरण्याची जबाबदारी लागू केली जाऊ शकते,अशी तरतूद नसताना पारित केलेला हा आदेश बेकायदेशीर होता. प्रस्तुत वेळी कायदयाच्या कलम ४४ मधील तरतूद खालीलप्रमाणे होती:

"जेथे कोणताही व्यवसाय,....एखाद्या भागीदारी संस्थेद्वारे चालवलेला.....बंद करण्यात आला आहे...अशा बंद होण्याच्या वेळी असलेली प्रत्येक व्यक्ती.. अशा भागीदारी संस्थेचा भागीदार,... भागीदारी संस्थेचे उत्पन्न, नफा आणि लाभ याच्या संदर्भात,देय कराच्या रकमेसाठी आणि प्रकरण चार च्या सर्व तरतुदींसाठी प्रकरण चार अंतर्गत कारनिर्धारणास, जसे असेल, अशा कोणत्याही निर्धारणास लागू होते, संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार असेल."

भागीदारी विसर्जित होण्यामुळे भागीदारीचा व्यवसाय बंद झाला यावर वाद नाही. तथापि, असा युक्तिवाद केला जातो की दंड आकारण्याची कार्यवाही आणि आयकर निर्धारणाची कार्यवाही या वेगळ्या बाबी आहेत आणि ज्या भागीदारी संस्थेचा व्यवसाय बंद करण्यात आला आहे तिच्याकडून देय कराचे निर्धारण करण्यासाठी कलम ४४ चा अवलंब केला जाऊ शकतो. परंतु, कायद्याच्या कलम २८ अंतर्गत दंड आकारण्याचा आदेश, अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे पारित करता येत नाही. कलम ४४ ज्या कंपन्यांनी त्यांचा व्यवसाय बंद केला आहे त्यांच्या कर दायित्वाचे निर्धारण करण्यासाठी यंत्रणा स्थापित करते आणि तीन परिणामांची तरतूद करते (१) एखाद्या भागीदारीचा व्यवसाय बंद केल्यावर, तो बंद करण्याच्या वेळी असणारी प्रत्येक भागीदार व्यक्ती कंपनीचे उत्पन्न नफा आणि लाभ संदर्भात संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे केल्या जाणाऱ्या

निर्धारणास जबाबदार आहे, (२) प्रत्येक भागीदार भागीदारी संस्थेद्वारे देय असलेली कराची रक्कम भरण्यास जबाबदार आहे आणि (३) प्रकरणातील तरतुदी, शक्यतोवर मूल्यनिर्धारणास लागू होतात. कलम ४४ ने घोषित केलेले दायित्व हे निःसंशयपणे प्रकरण चार अंतर्गत मूल्यनिर्धारणासाठी आहे, परंतु त्यात वापरलेले "मूल्यनिर्धारण" या अभिव्यक्तीचा अर्थ केवळ उत्पन्नाची गणना असा नाही. "मूल्यनिर्धारण" ही अभिव्यक्ती जी अनेकदा म्हटल्याप्रमाणे आयकर कायद्यात वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. आयकर आयुक्त, बॉम्बे प्रेसिडेंसिय आणि एडन विरुद्ध खेमचंद रामदास[2] या प्रकरणात प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायिक समितीने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले.

"बहुतेक प्राप्तिकर कायद्यामधील एक वैशिष्ट्य म्हणजे "मूल्यनिर्धारण"हा शब्द कधी उत्पन्नाची गणना, कधी देय कराच्या रकमेचे निर्धारण आणि काही वेळा करदात्यावर दायित्व लादण्यासाठी कायद्यात दिलेली संपूर्ण प्रक्रिया या अर्थाने वापरला जातो. भारतीय आयकर कायदा या संदर्भात अपवाद नाही....."

कायद्याच्या चौथ्या प्रकरणातील तरतुदींचा आढावा घेतल्यास पुरेसा खुलासा होतो की त्या प्रकरणात "मूल्यनिर्धारण" हा शब्द त्याच्या व्यापक अर्थाने वापरला गेला आहे. प्रकरणाचे शीर्षक "वजावट आणि मूलनिर्धारण असे आहे. जे कलम केवळ उत्पन्नाची गणना म्हणून

2 [१९३८] ६ आय.टी.आर.४१४

मूल्यनिर्धारणाशी संबंधित आहे ते कलम २३; परंतु अनेक कलमे उत्पन्नाच्या गणनेशी संबंधित नाहीत, पण दायित्वाचे निर्धारण, दायित्व लादण्यासाठी यंत्रणा आणि त्या संदर्भात प्रक्रिया याच्याशी संबंधित आहेत. कलम १८-अ कराचा आगाऊ भरणा आणि त्यातील तरतुदी पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास दंड लादण्याशी संबंधित आहे. कलम २३-अ विशिष्ट कंपन्यांच्या वैयक्तिक सदस्यांना लाभांश म्हणून वितरित केल्या गेलेल्या उत्पन्नाचे मूल्यनिर्धारण करण्याच्या अधिकाऱ्याशी संबंधित आहे, कलम २३-ब करपात्र क्षेत्रामधून विचलनाच्या बाबतीत मूल्यनिर्धारणाशी संबंधित आहे, कलम २४-ब मृत व्यक्तिंच्या इस्टेटमधून कर संकलनाशी संबंधित आहे; कलम-२५-ब बंद झालेल्या व्यवसायाच्या बाबतीत मूल्यनिर्धारणाशी संबंधित आहे. कलम-२५-अ हिंदू अविभक्त कुटुंबांच्या विभाजनानंतर मूल्यनिर्धारणाशी संबंधित आहे, कलम २९,३१,३३ आणि ३५ हे डिमांड नोटीस जारी करणे आणि अपील दाखल करणे आणि मूल्यनिर्धारणाचे पुनर्विलोकन करणे आणि कलम ३४ उत्पन्नाच्या मूल्यनिर्धारणाशी संबंधित आहे जे मूल्यनिर्धारणातून सुटले आहे. या कलमांमध्ये वापरलेली “मूल्यनिर्धारण” हि अभिव्यक्ती केवळ उत्पन्नाच्या गणनेच्या अर्थाने वापरली जात नाही आणि आमच्या मते जेव्हा कलम ४४ द्वारे असे घोषित केले आहे की भागीदार किंवा असोसिएशनचे सदस्य संयुक्तपणे आणि पृथकपणे मूल्यनिर्धारणास जबाबदार असतील, तेव्हा तो केवळ कलम २३ अंतर्गत उत्पन्नाच्या गणनेसाठी दायित्व घोषित करण्याचा हेतू आहे आणि कर दायित्वाची घोषणा करणे आणि तो लागू करणे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा लागू करण्याचा नाही. तसेच प्रकरण चार च्या सर्व

तरतुदी शक्यतोवर अशा मूल्यांकनासाठी लागू होतील" अशी अभिव्यक्ती एक प्रतिबंधित सामग्री नाही: या संदर्भात असे म्हटले आहे की प्रकरण चार च्या सर्व तरतुदी कंपन्यांच्या मूल्यनिर्धारणासाठी लागू होतील,ज्यांनी त्यांचा व्यवसाय बंद केला आहे. कलम २८ द्वारे कर पात्र व्यक्तीच्या अप्रामाणिक शिरजोर वर्तनाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त कर जो विशिष्ट निर्देशित दंड आहे तो भरण्याचे दायित्व लादण्यात आले आहे. हे खरे आहे की हे दायित्व केवळ तेव्हाच उद्भवते जेव्हा प्राप्तिकर अधिकारी त्याला अधिकारक्षेत्र देणाऱ्या अटींच्या अस्तित्वाबद्दल समाधानी असेल आणि त्याचे प्रमाण केसच्या परिस्थितीवर अवलंबून असेल. दंड एकसमान नसतो आणि त्याचे लादणे कर आकारणी अधिकाऱ्यांच्या विवेकबुद्धीच्या वापरावर अवलंबून असते; परंतु ते कर दायित्वाच्या मूल्यनिर्धारणासाठीच्या यंत्रणेचा एक भाग म्हणून लादले जाते. कलम ४४ च्या शेवटच्या खंडातील "शक्य असेल तेथपर्यंत" या अभिव्यक्तीचा वापर प्रकरण चार च्या तरतुदींचा वापर जे केवळ उत्पन्नाच्या गणनेसाठी तरतूद करते त्यासाठी लागू करणे प्रतिबंधित करत नाही. "शक्य असेल तेथपर्यंत" या अभिव्यक्तीचा वापर करून केवळ प्रकरण चार मधील तरतुदी लागू करण्याचा हेतू आहे. त्यांच्या स्वभावामुळे भागीदारी कंपन्यांना लागू होत नाही त्या कलम ४४ द्वारे लागू होणार नाही. प्रभावीपणे, विधानमंडळाने कलम ४४ अन्वये असे अधिनियमित केले आहे की जणू काही खंडन झालेले नाही अशा प्रकारे ज्या भागीदारी संस्थेचा व्यवसाय बंद झाला आहे त्या विरुद्ध मूल्यनिर्धारणाची कार्यवाही सुरु केली जाऊ शकते आणि चालू ठेवली जाऊ शकते. भागीदारी संस्थेचा व्यवसाय बंद झाला असतानाही कर दायित्वाचे मूल्यनिर्धारण आणि तो

लादण्यासाठी तरतूद केलेल्या यंत्रणेच्या वापरामध्ये सातत्य सुनिश्चित करण्यासाठी हे स्पष्टपणे लागू केले आहे. एका काल्पनिक गोष्टीनुसार, प्रकरण चार अंतर्गत मूल्यनिर्धारणाच्या उद्देशाने कंपनी बंद झाल्यानंतर सुरु आहे असे मानले जाते.

विधानमंडळाने स्पष्टपणे अधिनियमात केले आहे की प्रकरण चार च्या तरतुदी एखाद्या भागीदारी संस्थेने व्यवसाय बंद केल्यानंतरही केलेल्या व्यवसायाच्या मूल्यनिर्धारणास लागू होतील आणि जर मूल्यनिर्धारणाच्या प्रक्रियेमध्ये दंड आकारण्यासाठी पावले उचलने समाविष्ट असेल तर, विधानमंडळाने अहेतुकपणे कायद्यात उणीव ठेवली आहे या कथनाचे खंडन होते. अपीलकर्त्याच्या युक्तिवादात हे अंतर्निहित आहे की ते वर्तनासाठी दोषी असलेल्या भागीदारी संस्थेचे भागीदार ज्यांना कलम २८ अंतर्गत दंड ठोठावण्यात आला आहे, त्यांना भागीदारी संस्था बंद करून दंड टाळण्याचा सोपा उपाय खुला आहे, हे कथन तेव्हाच स्वीकारले जाऊ शकते जेव्हा न्यायालयाला, निःसंदिग्ध भाषेच्या दृष्टिकोनातून, विधीमंडळाचा हेतू आहे असे मानण्यास भाग पडले जाते. इथे वापरलेल्या भाषेचा असा अर्थ लावला जात नाही. आर्थिक कायद्याचा अर्थ लावताना, जर काही उणीवा असतील तर न्यायालय त्या दुरुस्त करू शकत नाही: न्यायालयाने जसा कायदा आहे त्यानुसार कायद्याचा अर्थ लावणे आवश्यक आहे आणि काही शंका असल्यास करदात्याला अनुकूल रीतीने अर्थ लावणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या प्रकरणाप्रमाणे, सर्वसमावेशक आयात करण्यास सक्षम या शब्दांच्या वापराद्वारे, फसवणूक,घोर निष्काळजीपणा किंवा शिरजोर वर्तनासाठी दोषी करदात्यांना दंड भरण्याचे दायित्व लादण्याची तरतूद केली जाते,

तेथे ठराविक वर्गाच्या विधानमंडळाच्या मान्य केलेल्या उद्देशाला पराभूत करण्यासाठी हे शब्द मर्यादित अर्थाने वापरले गेले असे गृहीतक हलकेपणाने मांडले जाणार नाही.

अपीलकर्त्याचे वकील ज्यांनी महाकाली सुब्बाराव विरुद्ध आयकर आयुक्त[3] या प्रकरणाचा आधार घेतला ज्यामध्ये असा निर्णय देण्यात आला की, भारतीय आयकर कायद्याच्या कलम २८(१)(क) अंतर्गत विघटित हिंदू संयुक्त कुटुंबावर दंड आकारण्याचा आणि कलम २५ अ (१) अंतर्गत ते विघटन मान्य करण्यात आल्याचा आदेश अवैध आहे, कारण कायद्यात एक उणीव आहे. त्यांनी असे सादर केले आहे की विसर्जित भागीदारी संस्थांच्या संबंधात सदर कायद्यामध्ये सामान उणीव आहे. परंतु हिंदू संयुक्त कुटुंब विसर्जित केल्यावर कुटुंबाच्या अस्तित्वात असण्याच्या काळात येऊ शकणाऱ्या दंडाचे दायित्व कलम २८ अन्वये लादता येणार नाही का, हे या प्रकरणात निर्णयासाठी येत नाही. कलम २५-अ आणि कलम ४४ च्या तरतुदी एकाच विषयाशी संबंधित नाहीत एवढे निरीक्षण नोंदविणे पुरेसे असू शकते. कलम २५-अ मध्ये अशा कोणत्याही वाक्यांशाच्या अनुपस्थितीत, जो कलम ४४ मध्ये वापरला आहे, त्या कलमातील आणि कलम ४४ मधील तरतुदीमध्ये कोणतेही वास्तविक साधर्म्य असल्याचे गृहीत धरले जाऊ शकत नाही. कलम ४४ द्वारे, घोषित केलेले संयुक्त आणि पृथक दायित्व हे एखाद्या भागीदारी संस्थेचे उत्पन्न,नफा किंवा लाभ यांच्या संदर्भात मूल्यनिर्धारणाबाबतचे दायित्व आहे जिने तिचा

---

3 [१९५७] ३१ आय.टी.आर.८६७.

व्यवसाय बंद केला आहे, परंतु जर उत्पन्न, नफा किंवा लाभाचे मूल्यनिर्धारण करण्याच्या प्रक्रियेत कलम २५, उपकलम (२) किंवा कलम १८-अ, उपकलम (४),(६),(७),(८) आणि (९) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे इतर कोणतेही दायित्व जसे की दंड किंवा दंडात्मक व्याज भरण्याचे दायित्व निर्माण झाले तर व्यवसाय बंद केला जाण्याच्या स्थितीमध्ये देखील तो लागू केला जाऊ शकतो.

आमच्या मते, सरन्यायाधीश सुब्बा राव यांनी मरेड्डी कृष्णा रेड्डीच्या खटल्यात (सुप्रा)बरोबर म्हटले आहे की: “कलम २८ हे प्रकरण चार मधील कलमांपैकी एक आहे. ते उत्पन्न लपविण्यासाठी किंवा नफ्याच्या अयोग्य वाटपासाठी दंड आकारते. एकूण उत्पन्नाचा परतावा सादर करण्यात, कलम २२ च्या उपकलम (४) किंवा कलम २३ च्या उपकलम (२) मधील नोटीस बाबत पालन करण्यात, उत्पन्नाचे तपशील लपविण्यात किंवा अशा उत्पन्नाचे अपुरे तपशील जाणूनबुजून सादर करण्याची चूक करण्यात आली तर त्या कलमांतर्गत दंड आकारला जातो. त्यामध्ये विषद केले गेलेले दोष मूल्यनिर्धारणाच्या प्रक्रियेशी संबंधित आहेत. म्हणून कलम २८, करपात्र उत्पन्नाचे योग्य मूल्यनिर्धारण सुलभ करण्यासाठी लागू केलेली तरतूद आहे आणि प्रकरण चार अंतर्गत केलेल्या मूल्यनिर्धारणास योग्यरित्या लागू आहे असे म्हणता येईल. कायद्याच्या कलम २५-अ मध्ये आढळते, तशी उणीव कलम ४४ मध्ये आहे आम्ही असे म्हणू शकत नाही.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने आयकर आयुक्त विरुद्ध रायलसीमा ऑइल मिल्स[4] या

4 [१९५९] ३७ आय.टी.आर.२०८.

प्रकरणात नंतरच्या पूर्णपीठाद्वारे दिल्या गेलेल्या कथित निकालाद्वारे मरेड्डी कृष्ण रेड्डी (उपरोल्लेखित) मधील निकाल रद्द करण्याबाबत केलेल्या मताशी आम्ही सहमत नाही. तसेच एस.व्ही. वीरप्पन चेट्टियार विरुद्ध आयकर आयुक्त, मद्रास[5] मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या मताशीही आम्ही सहमत नाही.

आम्ही घेतलेल्या दृष्टिकोनातून, अपील अयशस्वी झाले आणि खर्चासह डिसमिस केले गेले.

अपील फेटाळले.

****

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

****

5 [१९५७] ३२ आय.टी.आर.४११.